# कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावाचे निराकरण करणेसाठी कंत्राटी पदभरती जाहीरात

## राष्ट्रीयआरोग्यअभियान
## जिल्हाआरोग्यसोसायटी, सातारा, महाराष्ट्र

जिल्हा आरोग्य सोसायटी, जिल्हा परिषद,सातारा अंतर्गत खालील कंत्राटी पदांकरीता अर्ज मागविणेत येतआहेत.

राज्यात कोरोनाचा COVID १९ वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन उद्रेक सदृश्य परिस्थिती हाताळणेसाठी अधिकचे आरोग्य सेवा देणारे अधिकारी व कर्मचारी यांची प्रा.आ.केंद्र स्तर, ग्रामिण रुग्णालय, उपजिल्हा व जिल्हा रुग्णालय स्तर तसेच कोरोना केअर सेंटर येथे कोरोनाचा COVID १९ साथीचा संसर्गजन्य आजार नियंत्रणात येईपर्यत शासकीय /महानगरपालिका /नगरपालिका सेवामधुन निवृत्त झालेले, बॉड पुर्ण झालेले व इतर परंतु आरोग्य सेवा देण्यास सक्षम असणा-या डॉक्टर्स, परिचारीका व इतर पदाची कंत्राटी पध्दतीने पदे भरावयाची आहेत. त्यासाठीइच्छुकउमेदवारांनी**www.zpsatara.gov.in**यासंकेतस्थळावरसदरजाहीरातपाहावी.

| अ.क्र | पदाचेनाव | वयोमर्यादा | शैक्षणिकअर्हता | मानधन | पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | फिजीशियन | ३८ वर्ष खुला प्रवर्ग ४३ वर्ष (७० वर्षापर्यंत सेवानिवृत्त) | MD Medicine/ DNB | ७५००० + Performance | 33 |
| २ | भुलतज्ञ | ३८ वर्ष खुला प्रवर्ग ४३ वर्ष (७० वर्षापर्यंत सेवानिवृत्त) | MD Anesthesia/DA/DNB | ७५००० + Performance | 33 |
| ३ | वैद्यकीय अधिकारी | ३८ वर्ष खुला प्रवर्ग ४३ वर्ष (७० वर्षापर्यंत सेवानिवृत्त) | MBBS | रु. ६००००/- प्रतिमाह | 119 |
| ४ | आयुष वैद्यकीय अधिकारी | ३८ वर्ष खुला प्रवर्ग ४३ वर्ष राखीव प्रवर्ग | BAMS/BUMS | रु. ३००००/- प्रतिमाह | 48 |
| ५ | हॉस्पिटल मॅनेजर | ३८ वर्ष खुला प्रवर्ग ४३ वर्ष राखीव प्रवर्ग | BAMS/BUMS+MBA/ HCA/MPH | रु. ३५०००/- प्रतिमाह | 26 |
| ६ | स्टाफ नर्स | ३८ वर्ष खुला प्रवर्ग ४३ वर्ष राखीव प्रवर्ग | GNM / B.Sc. Nursing | रु. २००००/- प्रतिमाह | 267 |
| ७ | क्ष किरण तंत्रज्ञ | ३८ वर्ष खुला प्रवर्ग ४३ वर्ष राखीव प्रवर्ग | Retd X-ray Technician | रु. १७०००/- प्रतिमाह | 31 |
| ८ | ई.सी.जी तंत्रज्ञ | ३८ वर्ष खुला प्रवर्ग ४३ वर्ष राखीव प्रवर्ग | Experience Of ECG Technician at least One Year | रु. १७०००/- प्रतिमाह | 31 |
| ९ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ३८ वर्ष खुला प्रवर्ग ४३ वर्ष राखीव प्रवर्ग | B.scDMLT | रु. १७०००/- प्रतिमाह | 48 |
| १० | औषध निर्माण अधिकारी | ३८ वर्ष खुला प्रवर्ग ४३ वर्ष राखीव प्रवर्ग | B.Pharm./ D.Pharm. | रु. १७०००/- प्रतिमाह | 22 |
| ११ | डाटा ऑपरेटर | ३८ वर्ष खुला प्रवर्ग ४३ वर्ष राखीव प्रवर्ग | Any Graduate with Typing Skill Marathi 30 & English 40, MSCIT | रु. १७०००/- प्रतिमाह | 16 |
| | एकुण | | | | 674 |

**अटी व शर्ती:-**

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्तीचा कालावधी हा कोरोना विषाणुची साथ असेपर्यंत राहील.

२) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हताधारकास प्राधान्य दिले जाईल.

६) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा परिषद, सातारा येथील नोटीस बोर्डवर व सातारा जिल्हा परिषदेच्या **www.zpsatara.gov.in** वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येईल, याबाबत कोणताही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

७) निवड यादीतील गुणाक्रमांकाच्या आधारे प्राधान्याने पदस्थापना दिली जाईल, त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रदद करण्यात येईल.

८) जाहीरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील. पद क्र १,२ व ३ करीता वयोमर्यादा अधिकतम ७० वर्षे राहील.

९) शासकीय/निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गतकार्यरत असणाऱ्या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

१०) उपरोक्त पदांपैकी तांत्रिक पदांकरीता, वैद्यकिय अधिकारी ई. पदांकरीता तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारस मुलाखतीस अपात्र ठरविले जाईल.

११) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रदद करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

१२) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु.१५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी रु.१००/- ची रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरावी लागेल.

13) सदरहु भरती प्रक्रियेकरीता ऑनलाईन अर्ज करणेची मुदत दि. १६/०७/२०२० अखेर राहणार असुन तदनंतर अर्जाची छाननी, लेखी परिक्षा/ मुलाखत प्रक्रिया, निवड यादी प्रसिध्द करणे, हरकती/आक्षेप प्राप्त करुन घेणे व त्या निकाली काढणे आदी रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानाकडील प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार भरती प्रक्रिया पार पाडुन निवड झालेल्या उमेदवारांना

नियुक्ती आदेश देणे इ. बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी सातारा जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर www.zpsatara.gov.in तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान विभागाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याबाबत पुनश्च वर्तमानपत्रामध्ये जाहीरात दिली जाणार नाही. तसेच उमेदवाराला मोबाईलद्वारे कळविले जाणार नाही.

- **अर्ज भरण्याचा कालावधी :- दि. १४/०७/२०२० ते दि. १८/०७/२०२०रोजी संध्याकाळी ०६.०० पर्यंत**
- **पदांची माहिती, संख्या, पदस्थापना पाहण्याचा वेबसाईटचा पत्ता:-www.zpsatara.gov.in**
- **ऑन लाईन अर्ज भरण्याची लिंक:-**http://bit.ly/NHMSTR
- OR QR Code

**खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती अर्जासोबत जोडाव्यात.**

१. शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका

२. पासपोर्ट आकाराचे २ फोटो

३. शाळा सोडल्याचा/जन्म तारखेचा दाखला

४. प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्रे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सही<br>जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक<br>एनएचएम,जि.प. सातारा | सही<br>जिल्हा शल्यचिकित्सक<br>जिल्हा रुग्णालय, सातारा | सही<br>जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद, सातारा | सही<br>मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, सातारा | सही<br>मा.जिल्हाधिकारी<br>सातारा |